# - प्रेस नोट -

दि. २७/०७/२०२६

## शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. २५/०७/२०२६ रोजी २३.०० वा. च्या सुमारास फिर्यादी मोहम्मद यसुफ पवकनसरी, वय-२५ वर्षे, धंदा- कारपेंटर, रा.ठी- साईबाबा मंदीराच्या पाठीमागे, इदगाह मैदान जवळ, कमलारामण नगर, बैंगनवाडी, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई हे राहत असलेल्या ठिकाणी फिर्यादींचा मामा मोकम्मद अहमद अन्सारी, वय- ३८ वर्षे यांचा मोबाईल हा फिर्यादींचा दाजी (बहिनीचा पती) अटक आरोपी क्रमांक ०१ पुरूष वय- २६ वर्षे हा घेऊन गेला होता. सदर मोबाईल परत आणण्याबाबत वेळोवेळी अटक आरोपी क्रमांक ०१ यास फोन करून सांगितले. त्याचा राग अटक आरोपी क्रमांक ०१ यास येवुन त्याचा भाऊ अटक आरोपी क्रमांक ०२ पुरूष वय- २१ वर्षे याच्यासोबत फिर्यादीच्या घरी आला. फिर्यादींशी वादविवाद करून शिवीगाळ केली व फिर्यादींचा मामा यांस मारहाण करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी व त्यांची आई मामाला वाचवण्याचा प्रयत्न करताना अटक आरोपी क्रमांक ०२ याने त्याच्याजवळील चाकु काढुन फिर्यादीला जिवे ठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादीच्या डोक्यात वार करून फिर्यादीला गंभीर जखमी केले. फिर्यादी यांची मामी गरोदर असताना तिच्या पोटात लाथ मारली आणि जमलेल्या सर्वांना जीवे ठार मारण्याची धमकी देवुन शिवीगाळ केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२६/०७/२०२६ रोजी गु.र.क्र.४६८/२६, कलम १०९(१), ३५१(३), ३५२, ११५(२),३(५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------